मंगळवार, दि २१ ऑक्टोबर २०२५

yuva.aadarsh@gmail.com

# युवा आदर्श

दिवाळी विशेषांक 2025

दीपक शेळके, संपादक

https://epaper.yuvaadarsh.com/



## संपादकीय...

# दिपावली... सण मोठा

हिंदू संस्कृतीतील सर्वात मोठा आणि भावनिक सण. या सणात केवळ प्रकाशाचा नव्हे, तर अंधारातून आशेच्या दिशेने प्रवास करण्याचा संदेश दडलेला आहे. पण, जसजसा काळ पुढे सरकतोय, तसतसे या सणाचे स्वरूपही बदलताना दिसते आहे. परंपरेतून आधुनिकतेकडे झुकलेल्या या उत्सवाने आता आपल्यासमोर काही गंभीर प्रश्न उभे केले आहेत - दिवाळीचा खरा अर्थ टिकून आहे का ? आपण आनंद साजरा करतो आहोत की दिखाऊपणात हरवून जात आहोत? दिवाळीचा उगम हा अंधःकारावर प्रकाशाचा, असत्यावर सत्याचा, अन्यायावर न्यायाचा विजय म्हणून झाला आहे. पारंपरिक पद्धतीने दिवे लावणे, घरांची स्वच्छता करणे, लक्ष्मीपूजन करणे आणि नातेसंबंधातील ताणतणाव विसरून एकत्र येणे या गोष्टींमधून दिवाळीचा सामाजिक आणि मानसिक संदेश प्रकट होतो. आज मात्र या सणाचे स्वरूप केवळ फटाके, खरेदी, सोशल मीडियावरील प्रदर्शन आणि ब्रँडेड भेटवस्तूंवर मर्यादित होत चालले आहे. सणाची आध्यात्मिक बाजू आणि सामूहिकता दुय्यम ठरत आहे. फटाके हे दिवाळीतील आकर्षण असले तरी त्याचं प्रमाण आता चिंताजनक पातळीवर गेलं आहे. धूर, आवाज आणि रासायनिक प्रदूषणामुळे वातावरणातील हवेचा दर्जा घसरतो, जनावरांवर आणि वयोवृद्धांवर त्याचा त्रासदायक परिणाम होतो. विशेषतः मुलांमध्ये बर्न इन्जुरीज आणि श्वसनाचे आजार वाढताना दिसतात. अनेकदा फटाके न फोडल्याशिवाय सणाचा आनंद नाही अशी धारणा तयार झाली आहे, पण या अतिरेकामुळे सणाचा हेतूच हरवतो. आनंद साजरा करणे चुकीचे नाही, पण तो आनंद इतरांच्या त्रासाचे कारण बनला, तर ती संस्कृती नव्हे, असंस्कृती ठरते. दरवर्षी देशभरात हजारो लोक फटाक्यांमुळे जखमी होतात. शासकीय नियमांनुसार परवानाधारक विक्रेत्यांकडूनच फटाके खरेदी करावेत, सार्वजनिक ठिकाणी किंवा वाहनांच्या रस्त्यावर फटाके फोडू नयेत, हे सर्वांना माहीत असूनही प्रत्यक्षात त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पालकांनी मुलांवर लक्ष ठेवणे, पाण्याची व प्राथमिक उपचारांची सोय ठेवणे आणि कापडी कपडे टाळणे हे मूलभूत सुरक्षा नियम प्रत्येक घरात पाळले गेले पाहिजेत. दिवाळी म्हणजे फक्त संपन्नतेचा उत्सव नाही. हा वाटून घेण्याचा आणि आनंद पसरवण्याचा सण आहे. आपल्या आजूबाजूच्या गरजूंसाठी काही केलं, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवलं, तर तीच खरी दिवाळी. अनेक ठिकाणी स्वयंसेवी संस्था गरीब मुलांना कपडे, मिठाई आणि दिवे वाटतात - या उपक्रमांमधून सणाची खरी भावना जिवंत राहते. दिवाळीच्या निमित्ताने बाजारपेठांमध्ये अब्जावधींची उलाढाल होते. पण त्याचवेळी मोठ्या प्रमाणात कचरा, प्लास्टिक व रासायनिक अवशेष निर्माण होतात. पर्यावरणपूरक दिवे, कागदी फुलझड्या, मातीचे दिवे आणि स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणे हीच काळाची गरज आहे. व्होकल फॉर लोकल ही संकल्पना दिवाळीसारख्या पारंपरिक सणात अधिक अर्थपूर्ण ठरते. दिवाळी सण मोठा नाही, आनंदाला तोटा नको! आनंद टिकवायचा असेल तर संयम, जबाबदारी आणि जागरूकता आवश्यक आहे. दिवाळीचा सण आपल्याला सांगतो आनंद मिळवण्यासाठी इतरांचा त्रास नको, प्रकाश पसरवण्यासाठी अंधार निर्माण करू नका. आपल्या कृतींनी पर्यावरण, समाज आणि स्वतःचा आनंद सुरक्षित ठेवणे हेच दिवाळीचे खरे लक्ष्मीपूजन आहे. दीपावली निमित्त आमचे सर्व वाचक, जाहीरातदार, हितचिंतक आणि सहकाऱ्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! आपल्या जीवनात आरोग्य, समृद्धी आणि समाधानाचा प्रकाश सदैव राहो.

**युवा आदर्श परिवार**
**प्रकाशाचा सण, विचारांचा उत्सव!**

# फटाका खरेदीसाठी मोठी गर्दी

## फ्रेश अन् दर्जेदार फटाके मिळण्याचे एकमेव ठिकाण जय बजरंग फटाका मार्केट - पवन झुंगे

### जय बजरंग फटाका मार्केटची वैशिष्ट्ये -

फ्रेश आणि नवे फटाके - थेट नामांकित कंपन्यांकडून
परवानाधारक व सुरक्षित उत्पादकांचे फटाके
सर्व प्रकार - अनार, चकरी, भुईचकरी, फुलझड्या, रॉकेट, सर्प, टॉर्च, आणि मुलांसाठी खास सेफ फटाके
होलसेल दरात किरकोळ विक्रीची सोय
संपूर्ण सुरक्षा उपायांसह अग्निशमन साधनांची व्यवस्था

**दिवाळीचा सण म्हणजे आनंद, प्रकाश आणि उत्साह! आणि या आनंदाला खऱ्या अर्थाने उजाळा देण्यासाठी फक्त एकच नाव - जय बजरंग फटाका मार्केट, पांजरापोळ मैदान, महेश नगर, बाजार समिती मार्ग, जालना!**




**जालना | प्रतिनिधी -** दिवाळी सणाची चाहूल लागताच जालना शहरातील फटाका बाजार पुन्हा एकदा उजळून निघाला आहे. शहरातील पांजरापोळ मैदान, महेश नगर, बाजार समिती मार्गावर असलेल्या जय बजरंग फटाका मार्केटमध्ये या दिवसांत नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व वयोगटातील ग्राहक फटाके खरेदीसाठी उत्साहाने गर्दी करत असून, बाजारपेठ दिवाळीच्या आनंदात न्हाऊन निघाली आहे.

जय बजरंग फटाका मार्केट मधील झुंगे फटाका शॉपचे पवन झुंगे यांनी युवा आदर्श शी बोलताना सांगितले की, दिवाळी हा प्रकाश आणि आनंदाचा उत्सव आहे. या सणाचा खरा आनंद सुरक्षित आणि दर्जेदार फटाक्यांमधूनच अनुभवता येतो. त्यांनी पुढे सांगितले की, बाजारात अनेक ठिकाणी स्वस्त फटाक्यांचा मोह दाखविला जातो; परंतु ते अनेकदा जुने, ओलसर किंवा अवैध साठ्याचे असतात. त्यामुळे नागरिकांनी फ्रेश, परवानाधारक व सुरक्षित कंपन्यांचे फटाकेच खरेदी करावेत.




झुंगे फटाका शॉपमध्ये मान्यता प्राप्त उत्पादक कंपन्यांचे फटाके उपलब्ध असून, होलसेल दरात आणि खात्रीशीर दर्जाचे फटाके मिळण्याचे शहरातील एकमेव विश्वासार्ह ठिकाण म्हणजे जय बजरंग फटाका मार्केट, असा दावा त्यांनी केला.

या मार्केटमध्ये सर्व प्रकारचे फटाके - अनार, चकरी, भुईचकरी, फुलबाजे, रॉकेट, फुलझड्या, लहान मुलांसाठी सेफ फटाके आणि सजावटीची लायटिंग सामग्री - सर्व काही एकाच ठिकाणी उपलब्ध आहे. विक्रेत्यांनी सुरक्षा उपाययोजना काटेकोर पाळल्या असून, दुकानांमध्ये अग्निशमन साधनांचीही योग्य व्यवस्था करण्यात आली आहे.

नागरिकांचा उत्साह ओसंडून वाहत असला तरी, पवन झुंगे यांनी सुरक्षा नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. फटाके फोडताना मुलांच्या सुरक्षिततेकडे लक्ष द्यावे, सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर फटाके न फोडता मोकळ्या जागेचा वापर करावा, असे ते म्हणाले.

दिवाळीपूर्व संध्याकाळी फटाका मार्केट परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे. विविध रंगांचे दिवे, फुलबाज्यांचा आवाज आणि ग्राहकांच्या गर्दीतून जालना शहरात पुन्हा एकदा दिवाळीची रंगत वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.


दीपावली
व पाडवा निमित्त
हार्दिक शुभेच्छा...!
कृषि उत्पन्न बाजार समिती, परतूर संचालक मंडळ
अवचार गुलाबराव असाराम
टेकाळे लक्ष्मणराव लिंबाजीराव
आकात बालासाहेब सिताराम
कवडे पद्माकर श्रीमंतराव
अंबेकर कविता गणेशराव
खतिब मेराजोद्दीन रियाजोद्दीन
होलाणी दिनेशकुमार रामबिलास
अग्रवाल सत्यनारायण रामेश्वर
खोसे अप्पासाहेब ज्ञानदेव
माने हरिराम अंबादास
जोगदंड नितिन अशोकराव
मुळे पाराजी कोंराजी
बोनगे दिपाली प्रशांत
हजारे मदनराव रामराव
राखे शाहाजी दगडुबा
वाणी विजय भगवान
सचिव लिपणे आर.बी व
सर्व कर्मचारी वृंद
सौंजन्यः
कृषि उत्पन्न बाजार समिती, परतूर
उपसभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, परतूर
सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, परतूर


शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
नक्षत्रांची करीत उधळण, दीपावली ही आली...
नवस्वप्नांची करीत पखरण, दीपावली ही आली...
सदिच्छांचे पुष्पे घेउनी, दीपावली ही आली...
शुभेच्छांचे गुच्छ घेउनी, दीपावली ही आली...
परतुर, मंठा, नेर, सेवली विधानसभा
मतदार संघातील तमाम जनतेस
दिपावली व पाडव्याच्या
हार्दिक हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
महेशभैय्या नळगे
जिल्हाप्रमुख, शिवसेना (उबाठा) जालना


प्रेरणास्थान
स्व.बाबासाहेब (भाऊ) आकात
दीपावली व पाडव्यानिमित्त
सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
बाबासाहेब (भाऊ) आकात नागरी सहकारी पतसंस्था म. परतुर
बाबासाहेब भाऊ आकात नागरी सहकारी पतसंस्था, परतूर.
पतसंस्थेची वैशिष्टये
१) मुदत ठेव योजना :- ३० ते ९० दिवस ६%, ९१ ते १८० दिवस ९%, १८१ ते ३६५ दिवस १०%, ३६५ ते पुढे १०.५०%
२) विशेष मुदत ठेव योजना :- ०७ महिने ते पुढे १०.५०%
३) मुदत ठेव (मासिक व्याज) :- दरमहा व्याज देणारी ही योजना आहे.
४) दामदुप्पट ठेव योजना :- ७८ महिन्यामध्ये दाम दुप्पट योजना
५) आवर्त ठेव योजना :- ३ वर्ष कालावधीसाठी १०.५०% व्याज देण्यात येईल.
६) पिग्मी :- १०० दिवसाच्या कालावधीवर पिग्मीचा विड्रॉल करण्याची सुविधा. तसेच ३६५ दिवसावर पिग्मी वर ५% रक्कमेवर व्याज देण्यात येईल.
७) कर्ज :- नोकरदार व व्यापा-यासाठी कर्जाची सोय उपलब्ध
८) मुदत ठेव तारण कर्ज :- मुदत ठेवीवर आधिक २% दराने कर्जाची सुविधा ऊपलब्ध
९) लाभांश :- दरवर्षी सभासदांना १०% लाभांश दिला जातो.
१०) गोल्ड लोन :- कमीत कमी व्याजदरात गोल्ड लोनची सुविधा उपलब्ध
११) वाहन कर्ज :- अल्प दरात टू व्हीलर व फोर व्हीलर साठी कर्जाची सोय उपलब्ध
कपिल भैय्या आकात (उपाध्यक्ष)
कुणाल दादा आकात (सचिव)
विजय राखे (अध्यक्ष)
RTGS/NEFT ची सुविधा ऑनलाईन ऊपलब्ध
पतसंस्थेला आयएफसी कोड प्राप्त
IFSC CODE :- ICIC0000104
ECOLLECTION CODE: BASP***
पत्ता : जय भवानी कॉलनी मेन रोड परतुर
मो. ९४२३६०९५५४


शुभ दिपावली
स्नेहाचा सुगंध दरवळला..
आनंदाचा सण आला..
एकच मागणे दिवाळी सणाला..
सौख्य, समृद्धी लाभो सर्वांना..
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!
*शुभेच्छुक*
संभाजी गणपतराव वारे
उपसभापती : कृषी उत्पन्न बाजार समिती, परतूर
9423458829/7559438999


भाजपा तालुका संघटन
सरचिटणीस
मा.श्री.
सावता काळे
सर्व बांधवांना दिपावली व भावभीजच्या
हार्दिक शुभेच्छा.


दिपावली, पाडवा व
भाऊबीजनिमित्त सर्व जनतेस
हार्दिक
शुभेच्छा
भारत बोराडे
आकणी, ता. परतूर


दिपावली, पाडवा व
भाऊबीजनिमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
इजरान
सेठ कुरेशी


दिपावली
च्या हार्दिक शुभेच्छा!
इंजे मेडिकल्स
छत्रपती शिवाजी महाराज चौक, जालना. +91 8908 111114
इंजे मेडिकल अँण्ड जनरल स्टोर्स
घनतृप हनुमान मंदिराजवळ, रामनगर, जालना. +91 8908 111114


सर्व संचालक, विश्वस्त, प्राध्यापक
शिक्षक, शिक्षकेत्तर बंधु-भगिनी सर्व
विद्यार्थी-विद्यार्थीनी यांना दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
नवभारत शिक्षण संस्था द्वारा संचलित
नवभारत कनिष्ठ महाविद्यालय, टेंभुर्णी व
श्रीमती जेबीके विद्यालय टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद जि. जालना.
शुभेच्छुक - माजी प्राचार्य भास्कर चेके, माजी उपप्राचार्य मधुकर झटे,
माजी चेअरमन सोसायटी कैलास भूतेकर, क्रिडा विभाग राजेश शेवाळे,
प्राध्यापक सुनील बनसोडे, कला विभाग वासुदेव क्षीरसागर, ज्येष्ठ शिक्षक समाधान कांबळे


दिपावलीनिमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
डॉ. आनंद भाले
विघ्नहर्ता क्लिनिक
गौरव देशमुख
विशाल देशमुख
मोरया मेडीकल
टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद जि. जालना


दिपावली निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
अंकुशराव देशमुख
चेअरमन सोसायटी
टेंभूर्णी
उत्तमराव देशमुख
हेड कॉन्स्टेबल,
जालना
सतीश देशमुख
हेड कॉन्स्टेबल,
जालना
टेंभुर्णी, ता. जाफ्राबाद जि जालना.


दिपावली,पाडव्यानिमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
सुधाकर पवार
शुभम पवार
शासकीय गुत्तेदार


जिजाऊ संकुलतर्फे सर्व नागरिक,
विद्यार्थी व पालकांना दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
संजयजी लहाने
शिक्षण सम्राट
सुयश लहाने
उभरते युवा नेतृत्त्व
डॉ. सुरेखाताई लहाने
माजी नगराध्यक्ष
मु. पो. ता. जाफ्राबाद जि. जालना


दिपावली
सना निमित्त सर्वांना
सोनेरी शुभेच्छा..!
शुभेच्छुक: राजू दत्तराव कुकडे.
अध्यक्ष डॉल्फिन इंग्लिश स्कूल वाटूर फाटा.


दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा!
Access
WhatsApp
Banking
• Balance Enquiry
• Last 10 Transaction
• Mobile No. Updation
• Cheque Book Request
• ATM Card Block
• Statement Request
• Inward Clearing Request
Send Hi on
98 5617 5617
(From your registered mobile number)
शुभेच्छुक
सचिन वाणी
मुख्य कार्यकारी अधिकारी
प्रियदर्शनी ना.स.बँक म. जालना
सी.ए. भूषण भक्कड
अध्यक्ष, प्रियदर्शनी ना.स.
बँक म. जालना
विलास बापू खरात
मा. आमदार (अंबड)
संस्थापक अध्यक्ष प्रियदर्शनी
ना. सह.बँक म.जालना
प्रियदर्शनी
नागरी सहकारी बँक मर्यादित जालना
विश्वास, सुरक्षा आणि सेवा
'ब्रह्मचैतन्य', देऊळगावराजा रोड, जालना
संपर्क : (०२४८२) २३३३४६


दिपावली, पाडव्यानिमित्त
सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा
सुभाष देविदान, शैलेश देविदान,
शासकीय गुत्तेदार


दिपावली व नूतन वर्षाच्या
पालकांना व विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा
महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटी
जाफ्राबाद द्वारा संचलित
१. आयेशा उर्दू हायस्कुल टेंभूर्णी
२. आयेशा उर्दू हायस्कुल, जाफ्राबाद
३. आयेशा उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, जाफ्राबाद
४. आयेशा उर्दू प्रायमरी स्कुल टेंभूर्णी
५. आयेशा इंग्लिश प्रायमरी स्कुल जाफ्राबाद
६. आयेशा इंग्लिश उच्च प्राथमिक व उच्च माध्यमिक (६ वी ते १२) स्कूल जाफ्राबाद.
हबीब-ऐदरूस
हबीब हामेद
क्रिडांगण, तज्ज्ञ प्राध्यापक
उत्कृष्ट निकाल (१०वी ते १२वी), भव्य इमारत, क्रिडांगण,
तज्ज्ञ प्राध्यापक, शिक्षक, डिजीटल शाळा प्रयोग शाळा


शिवसेना
(उद्धव बाळासाहेब ठाकरे)
दिपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा ..!
कोणतेही सत्तेचे पद नसतांना वंदनीय शिवसेनाप्रमुख
मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या संस्कारातुन ८०% समाजकारण व २०%
राजकारण व याप्रमाणे पक्ष संघटनेतील जिल्हाप्रमुख पदावरुन केलेली काही ठळक कार्ये
१) उत्तराखण्ड येथील जलप्रलयात शहिद सैनिकांच्या कुटुंबीयांचा गौरव करुन आर्थीक मदत केली. २) आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबीयांना मदत केली. ३) मुकाबला दुष्काळाची मोहीम राबुन २२ गावांना बोर घेऊन दिले त्यापैकी १७ गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवला. ४) कर्ज मुक्त शेतकऱ्यांचा गौरव. ५) जेष्ठ नागरीकांचा गौरव : पाऊले चालती शंभरीची वाट. ६) शेतकरी प्रश्नांवर शाससनाचे लक्ष्य वेधण्यासाठी नेर ते नाव्हा पायीदिंडी व रास्ता रोको आंदोलन ७) जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर व्हावा या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना घेराव. ८) शहरातील रस्ते व मुर्तीवेस दुरुस्तीसाठी आंदोलन. ९) शहरातील नागरी प्रश्नांवर आयुक्तांना घेराव, आँखे तो खोलो स्वामी आंदोलीन १०) जिल्ह्यात केंद्र व राज्य सरकारच्या योजनांचा भांडा फोड करण्यासाठी होऊ द्या चर्चा मोहीम राबविली.इ.
आपत्ती काळातील कार्ये : * कोविडमुळे आधार गमावलेल्या १५७ कुटुंबीयांना मदतीचा हात. * १०,००० घरांपर्यंत भाजीपाला वाटप * १७०० कुटुंबीयांना अन्नधान्य किट वाटप * पर राज्यात जाणाऱ्या वाटसरुंसाठी २ महिने अन्नछत्र * रोज १२०० खिचडी डब्यांचे सतत २ महिने वाटप * १८०० कुटुंबीयांना किराणा किट वाटप * शहरात २०,००० मास्कचे वाटप * ४०० कोरोना योध्दयांचा भेटवस्तु देऊन गौरव * मुख्यमंत्री सहाय्यता निधीस रु.०२,५१,०००/- मदत * लसिकरण कॅम्पद्वारे १३,००० नागरिकांचे लसिकरण. * सर्वात प्रथम कोरोना लस घेणाऱ्या कर्मचाऱ्यांवर पुष्पवृष्टी * लसीकरण करणाऱ्या परिचारिकांचा गौरव * जनजागृतीसाठी शहरात २०,००० पॉम्पलेट वाटप. * ॲटोरिक्षा द्वारे सतत ३ महिने जनजागृती प्रचार * रक्तदान शिबीरांचे आयोजन * कोरोना लसिकरण जागृतीसाठी गावो - गावीबैठका घेतल्या. * पुरग्रस्त नागरिकांसाठी अन्नधान्य किट व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप.
शहिद सैनिकांच्या कुटुंबीयांना गौरव भेट आर्थिक मदत
मुकाबला दुष्काळाचा
कोवीड योध्दयांचा गौरव
कोवीडमुळे आधार गमविलेल्या शेतकरी कुटुंबीयांना मदतीचा हात
कोवीड लसीकरण शिबीर
पुरग्रस्तांना किट वाटप
शुभेच्छुक : भास्कर अंबेकर
शिवसेना जिल्हा प्रमुख,जालना
अमोल डिजीटल /9823947494

# बलीप्रतिपदा (दिवाळी पाडवा)

अत्यंत दानशूर, परंतु दान कोणाला द्यावे याची जाण नसलेल्या बलीराजाला भगवान श्रीविष्णूने वामनावतार घेऊन पाताळात धाडल्याचा हा दिवस. त्रिपाद भूमी दान मागून वामनाने बलीराजाला जरी पाताळात धाडले असले, तरी सर्वार्थाने त्याचे कल्याणच केले आहे. पृथ्वीतलावर दीपावली साजरी केली जाण्यामागेदेखील या घटनेचा प्रमुख आधार आहे. बलिप्रतिपदा सणाविषयीचे शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून जाणून घेऊया.

१. तिथी : कार्तिक शुद्ध प्रतिपदा (दिवाळी पाडवा). श्रीविष्णूने ही तिथी बलीराजाच्या नावाने केली, म्हणून या तिथीला 'बलीप्रतिपदा' म्हटले जाते.

२. इतिहास : बलीराजा हा अत्यंत दानशूर होता. दारी येणारा अतिथी जे मागेल ते दान तो त्याला देत असे. 'दान देणे' हा गुण आहे; पण गुणांचा अतिरेक हा दोषार्हच असतो. कोणाला काय, केव्हा आणि कोठे द्यावे याचा निश्चित विचार आहे अन् तो शास्त्रात आणि गीतेत सांगितला आहे. सत्पात्री दान द्यावे. अपात्री देऊ नये. अपात्र माणसांच्या हाती संपत्ती गेल्याने ते मदोन्मत्त होऊन वाटेल तसे वागू लागतात. बलीराजा कोणालाही केव्हाही जे मागेल ते देत असे. तेव्हा भगवान श्री विष्णूने मुंजा मुलाचा अवतार (वामनावतार) घेतला. (मुंजा मुलगा लहान असतो अन् तो ' भवति भिक्षां देही ।' म्हणजे 'भिक्षा द्या' असे म्हणतो.) वामनाने बलीराजाकडे जाऊन भिक्षा मागितल्यावर त्याने विचारले, ''काय हवे ?'' तेव्हा वामनाने त्रिपाद भूमीदान मागितले. 'वामन कोण आहे आणि या दानामुळे काय होणार', याचे ज्ञान नसल्याने बलीराजाने त्रिपाद भूमी वामनाला दान दिली. त्याबरोबर वामनाने विराटरूप धारण करून एका पायाने सर्व पृथ्वी व्यापून टाकली. दुसर्या पायाने अंतरिक्ष व्यापले अन् त्याने ''तिसरा पाय कोठे ठेवू ?'', असे बलीराजास विचारले. त्यावर बलीराजा म्हणाला, ''तिसरा पाय माझ्या मस्तकावर ठेवा.'' तेव्हा 'तिसरा पाय त्याच्या मस्तकावर ठेवून बलीराजाला पाताळात घालावयाचे' असे ठरवून वामनाने, ''तुला काही वर मागावयाचा असेल तर माग (वरं ब्रूहि)'', असे त्याला सांगितले. तेव्हा त्याने वर मागितला, 'आता पृथ्वीवरील माझे सर्व राज्य संपणार आहे आणि आपण मला पाताळात घालविणार आहात, तेव्हा तीन पावले टाकण्याचे जे सर्व घडले, ते पृथ्वीवर प्रतिवर्षी तीन दिवस तरी माझे राज्य म्हणून ओळखले जावे. प्रभू, यमाप्रीत्यर्थ दीपदान करणार्याला यमयातना होऊ नयेत, त्याला अपमृत्यू येऊ नये आणि त्याच्या घरी लक्ष्मीने निरंतर वास करावा.' ते तीन दिवस म्हणजे आश्विन कृष्ण चतुर्दशी, आश्विन अमावास्या आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा. याला 'बलीराज्य' असे म्हणतात.




३. महत्त्व : दिवाळी पाडवा साडेतीन मुहूर्तांपैकी अर्धा मुहूर्त आहे. हा 'विक्रम संवत' कालगणनेचा वर्षारंभदिन म्हणून साजरा करतात.

४. सण साजरा करण्याची पद्धत

या दिवशी बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन करून त्याला नैवेद्य दाखवला जातो; म्हणजेच त्याच्या क्षुधा-तृष्णा शांत केल्या जातात. बलीप्रतिपदेच्या दिवशी जमिनीवर पंचरंगी रांगोळीने बली आणि त्याची पत्नी विंध्यावली यांची चित्रे काढून त्यांची पूजा करतात. यानंतर बलीप्रीत्यर्थ दीप अन् वस्त्रे यांचे दान करतात. या दिवशी प्रातः काळी अभ्यंगस्नान केल्यावर स्त्रिया पतीला ओवाळतात. दुपारी ब्राह्मणभोजन घालतात. या दिवशी पक्वान्नांचे भोजन करतात.

पाडव्याला पतीला ओवाळण्यामागील आध्यात्मिक महत्त्व काय ? - या दिवशी प्रातःकाळी अभ्यंगस्नान केल्यावर स्त्रिया पतीला ओवाळतात. पुरुष हे शिवाचे आणि स्त्री हे दुर्गादेवीचे प्रतीक आहे. ओवळल्यामुळे पत्नीमध्ये दुर्गातत्त्व कार्यान्वित होते आणि पतीचे औक्षण केल्यानंतर त्याची कुंडलिनीशक्ती जागृत होऊन त्याच्यातील सुप्तावस्थेत असणारे शिवतत्त्व प्रकट होते.

बलीराज्यात शास्त्राने सांगितलेली निषिद्ध कर्मे सोडून आपल्या मनाला वाटेल तसे लोकांनी वागावे', असे धर्मशास्त्र सांगते. अभक्ष्यभक्षण, अपेयपान आणि अगम्यागमन ही निषिद्ध कर्मे आहेत; म्हणून या दिवसांत माणसे दारू उडवितात (आतषबाजी करतात); पण दारू पीत नाहीत ! शास्त्राने परवानगी दिली असल्याने परंपरेने लोक या दिवसांत मौजमजा करतात.

या दिवशी लोक नवी वस्त्रावरणे लेवून सर्व दिवस आनंदात घालवितात. या दिवशी गोवर्धनपूजा करण्याची प्रथा आहे. त्यासाठी शेणाचा पर्वत करून त्यावर दूर्वा आणि फुले खोचतात. श्रीकृष्ण, इंद्र, गायी अन् वासरे यांची चित्रे शेजारी मांडून त्यांचीही पूजा करतात आणि मिरवणूक काढतात.

५. ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा करत देवत्वाला पोहोचलेल्या बलीची आठवण करावी ! : 'बलीप्रतिपदेला बळीची पूजा करतात. बळीने राक्षस कुळात जन्म घेऊनही त्याच्या पुण्याईने त्याच्यावर वामनदेवाची कृपा झाली. त्याने ईश्वरी कार्य समजून जनतेची सेवा केली. तो सात्त्विक वृत्तीचा आणि दानी राजा होता. प्रत्येक मानव हा सुरुवातीला अज्ञानी असल्यामुळे त्याच्या हातून वाईट कृत्य घडत असते; परंतु ज्ञान आणि ईश्वरी कृपा यांमुळे तो देवत्वाला पोहोचू शकतो, हे या उदाहरणावरून दिसून येते. अशा निर्भयतेने सत्कर्माचे पालन केल्यावर त्याला मृत्यूभयच रहात नाही. यमसुद्धा त्याचा मित्र व बंधू होतो. या दिवशी भगवंताने वामन अवतारात दाखवून दिले की, भगवंत हा सर्वस्व अर्पण करणार्याचा दाससुद्धा होण्याची तयारी ठेवतो. बली वास्तविक असुर घराण्यातील असूनसुद्धा त्याच्या उदार तत्त्वामुळे अन् त्याने भगवंताला शरण जाऊन आपले सर्वस्व अर्पण केल्यामुळे भगवंताने त्याला योग्य मार्गदर्शन करून त्याच्या जीवनाला कलाटणी दिली आणि त्याचा उद्धार केला. त्याच्या राज्यात असलेले असुरवृत्तीला पोषक असे भोगमय विचार घालवून, त्या ठिकाणी त्यागाची भावना रुजवून, जनतेला दैवीविचार देऊन सुख आणि समृद्धी यांचे जीवन प्रदान केले.' - परात्पर गुरु परशराम माधव पांडे महाराज

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'**

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था संपर्क- ९२८४०२७१८०**









हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com